RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारतीय शेतमाल निर्यात

**जनार्धन जी. जाधव**
प्राचार्य,
अर्थशास्त्र विभाग, (पदवी आणि पदव्युत्तर)
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.
(महाराष्ट्र) -४१५००१
ई मेल : janardhan.jadhav11@yahoo.in

**निलेशकुमार एन. गुरव**
सहाय्यक प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग, (पदवी आणि पदव्युत्तर)
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.
(महाराष्ट्र) -४१५००१
ई मेल - nileshkmar.gurav@gmail.com

## १. प्रास्ताविक

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे दूर व्हावे, व्यापरात वाढ व्हावी, युद्धोत्तर आर्थिक पुनर्रचना, नविन आर्थिक विकासाचा प्रश्न सोडवणे, विनिमयदर निश्चिती, सभासद राष्ट्रांच्या व्यवहार तोलातील तूटीची समस्या हाताळण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटन (खढज)स्थापन करण्याचा प्रस्ताव होता. तथापि या प्रश्नांबाबत एकमत न झाल्याने त्यापेक्षा लवचिक अशा ''जकात व व्यापारविषयक सर्वसाधारण करार'' (गॅट) ची ३० ऑक्टोबर १९४७ ला स्थापना करण्यात आली. गॅटच्या आठव्या ''उरुग्वे फेरी''मध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकृतीबंध बदलण्याचा प्रस्ताव ठेवला. आंतरराष्ट्रीय व्यापारात सेवा क्षेत्र व कृषी क्षेत्राचा समावेश करण्याचा प्रस्ताव ठेवला तसेच विकसित देशांनी सर्व देशांना समान व्यापार कायदे असावेत असा आग्रह धरला परंतु विकसनशील देशांनी त्याला विरोध केला. यावर तोडगा काढण्यासाठी व एकमत करण्यासाठी गॅटचे सरसंचालक सर ऑर्थर डंकेल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने निर्माण केलेल्या ठरावाला डंकेल प्रस्ताव म्हणतात. त्या प्रस्तावानुसार १ जानेवारी १९९५ ला ''जागतिक व्यापार संघटना'' (WTO) अस्तित्वात आली व गॅटचे अस्तित्व संपुष्टात आले. भारत गॅट व जागतिक व्यापार संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. त्यामुळे भारताला सर्व अटी लागू झाल्या.

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारताच्या शेतमाल निर्यातीत झालेला बद्दल अभ्यासने या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे. सन १९९५-९६ मध्ये भारताची एकूण निर्यात १०६३५३.४ कोटी रुपये होती. त्यात शेतमाल निर्यात २०३९७.७४ कोटी होती व एकूण निर्यातीत शेतमाल निर्यातीचा हिस्सा १९.१८% होता. सन २०११-१२ मध्ये भारताची एकूण निर्यात १४३९२८०.५१कोटी रुपये झाली त्यात शेतमाल निर्यात १८७४७५.८९कोटी होती व एकूण निर्यातीत शेतमाल निर्यातीचा हिस्सा १२.८५% इतका झाला. जगाच्या एकूण निर्यातीत भारतीय निर्यातीचा हिस्सा २०११ मध्ये १.७०% होता. तांदूळाच्या निर्यातीत ११.२%, मसाल्याच्या पदार्थाच्या निर्यातीत १५.५% होता. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारतीय शेतमाल निर्यातीचा जागतिक निर्यातीतील हिस्सा जरी वाढला असला तरी तो नगण्य आहे.

## २. शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये

१.जागतिक व्यापार संघटनेचा आंतरराष्ट्रीय शेती करार अभ्यासणे.

२. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील शेतमालाचा हिस्सा अभ्यासणे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

३. भारताच्या शेतमालाची निर्यात प्रवृत्ती अभ्यासणे.

४. भारताच्या शेतमाल निर्यातीची दिशा अभ्यासणे.

### ३. शोधनिबंधाची अभ्यासपद्धती

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीवर आधारीत आहे. १ जानेवारी १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली तेव्हापासून भारतीय शेतमालाचा निर्यात व्यापारातील प्रवृत्ती, शेतमालाच्या निर्यात व्यापाराची दिशा, भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील शेतमालाचा हिस्सा व आंतरराष्ट्रीय शेती करार या प्रमुख चलावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. सदर शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती भारताची आर्थिक पाहणी २०१०-११/२०११-१२, RBI, Handbook of Statistics on the Indian Economy, 2011-12 d Indian Agricultural Statistics at a glance 2011या संदर्भस्त्रोतांतून घेण्यात आलेली असून साध्या संख्याशास्त्रीय पद्धतीचा उपयोग करुन आकडेवारीचे विश्लेषण केलेले आहे. गहू निर्यातीचा संयुक्त वृद्धीदर काढण्यासाठी ज्या ठिकाणी निर्यात शून्य आहे. त्या ठिकाणी सरासरी निर्यात घेतली आहे.

### ४. गृहितके

१. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील शेतमालाचा हिस्सा घटत आहे.

२. भारताच्या शेतमाल निर्यात व्यापारात मूल्यवृद्धी झाली आहे.

३. भारताच्या शेतमाल निर्यात व्यापार दिशेत बदल झाला आहे.

### ५. आंतरराष्ट्रीय शेती करार

२४ एप्रिल १९९४ रोजी मारककेश या मोरोक्को देशातील शहरात जागतिक करार झाला. त्यात प्रथमच शेतीचा समावेश करुन शेती क्षेत्राचा व्यापार खुला करण्याच्या तरतुदी केल्या, त्यालाच शेतीविषयक आंतरराष्ट्रीय करार असे म्हणतात. त्यामध्ये शेतमालाचा आंतरराष्ट्रीय व्यापार खुला करण्यासाठी निर्यात अनुदान व देशांतर्गत सहाय्यात घट करणे व कृषी मालाचा बाजार टप्प्या-टप्प्याने खुला करण्याच्या संदर्भात अटी घातलेल्या आहेत. त्या अटी पुढील प्रमाणे आहेत. त्या अटीसाठी पायाभूत वर्ष १९८६-८८ हे गृहीत धरले आहे.

### ५.१ बाजार प्रवेश (Market Access)

शेतमालाचा बाजार प्रवेश वाढविण्यासाठी बिगर प्रशुल्क अडथळे हे प्रशुल्क अडथळ्याच्या समान धरलेले आहेत. सन १९८६-८८ हे पायाभूत वर्ष धरुन विकसित देशांनी १९९५ ते २००० या सहा वर्षात प्रशुल्कात (आयात करात) ३६% नी घट करावी व प्रत्येक कृषी उत्पादनावर किमान प्रशुल्कात १५% कपात करावी.

विकासनशील देशांनी १९९५ ते २००४ या दहा वर्षात प्रशुल्कात (आयात करात) २४% घट करावी व प्रत्येक कृषी उत्पादनावर किमान प्रशुल्कात १०% कपात करावी.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

देशांतर्गत बाजारपेठेच्या किमान ३% पेक्षा कमी हिस्सा आयातीसाठी खुला असेलतर तो टप्प्याटप्प्याने ३% पर्यंत वाढवावा व कराराच्या शेवटी ५% पर्यंत वाढवावा. आयातीवर कोणत्याही प्रकारची संख्यात्मक बंधने लादता येणार नाहीत.एखाद्या देशाची परकीय चलनविषयक परिस्थिती खराब असेल तर अशावेळी या कराराच्या तरतुदीतून सूट दिली जाईल.

## ५.२ देशांतर्गत सहाय्य

शेतीसंदर्भात दिले जाणारे देशांतर्गत सहाय्यात घट करण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेने तीन पेटी मध्ये तरतुदी केलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे आहेत.

### ५.२.१ हिरवी पेटी (Green Box)

हिरव्या पेटीत दिले जाणारे अनुदान पर्यावरण सुधारण्यासाठी, किड व रोगराई प्रतिबंधक उपाय, प्रशिक्षण, संशोधन व पायाभूत सुविधा यावर खर्च करण्यासाठी असणार आहे. ह्या अनुदानाचा किंमतीवर विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे या पेटीत अनुदान घटीची तरतूद नाही.

### ५.२.२ निळी पेटी (Blue Box)

निळ्या पेटीतील अनुदान शेतकऱ्यांने आपले शेतमालाचे उत्पादन नियंत्रीत करावे म्हणून दिले जाते. हे अनुदान खुल्या व्यापार तत्वाच्या विरोधी आहे म्हणून त्यांच्यावर मर्यादा घातली आहे.

### ५.२.३ अंबर पेटी (Amber Box)

शेतमाल हमीभाव, खते, वीज, कर्ज, व्याज, बियाणे यावर मिळणारे अनुदान, कृषी संशोधन, विस्तार सेवा, पर्यावरण संरक्षण, पायाभूत सोयीसाठी सरकार करत असलेला खर्च या सर्वांचा समावेश देशांतर्गत सहाय्यातहोतो. या प्रकारच्या अनुदानामुळे स्पर्धात्मक उत्पादकाची बाजार पेठ कमी स्पर्धात्मक उत्पादकाला मिळते. म्हणून ही सर्व अनुदाने एकत्र करुन जो निर्देशांक काढला जातो. त्यास ''सकल समर्थन निर्देशांक'' (Agreegate measure of support - AMS) म्हणतात. यामध्ये घट करण्याचे बंधन करारात आहे. १९८६-८८ हे पायाभूत वर्ष गृहीत धरुन त्यावेळेस जो सरासरी अचड असेल त्यात विकसित देशांनी १९९४ ते २००० या काळात २०% व विकसनशील देशांनी १९९४ ते २००४ या काळात १३% घट करावी असे बंधन घातले.

## ५.३ निर्यात अनुदान (Export Subsidey)

१९८६-८८ हे पायाभूत वर्ष गृहीत धरुन विकसित देशांनी १९९५ ते २००० या सहा वर्षात आपले निर्यात अनुदान ३६% नी कमी करावे व निर्यात अनुदान दिल्या जाणाऱ्या वस्तूंची संख्या २१% नी कमी करावी व विकसनशील देशांनी १९९५ ते २००४ या दहावर्षात आपले निर्यात अनुदान २४% नी कमी करावे व निर्यात अनुदान दिल्या जाणाऱ्या वस्तूची संख्या १४% कमी करावी अशी अट होती.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## ६. भारताच्या आयात- निर्यातीमधील शेतमाल आयात -निर्यातीचा हिस्सा

कोष्टक क्र. १ मध्ये सन १९९५-९६ पासून २०११-१२ पर्यंत भारताच्या आयात-निर्यातीमधील शेतमाल आयात-निर्यातीचा हिस्सा, शेतमाल आयात,शेतमाल निर्यात,एकूणआयात व एकूण निर्यात दर्शविली आहे.

कोष्टक क्र. १

**भारताच्या आयात- निर्यातीमधील शेतमाल आयात -निर्यातीचा हिस्सा(रुपये कोटी)**

| वर्ष | शेतमाल आयात | एकूणआयात | एकूण आयातीतील शेतमाल आयातीचा हिस्सा | शेतमाल निर्यात | एकूण निर्यात | एकूण निर्यातीतील शेतमाल निर्यातीचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५-९६ | ५८९०.१ | १२२६७८.१ | ४.८० | २०३९७.७४ | १०६३५३.४ | १९.१८ |
| १९९६-९७ | ६६१२.६ | १३८९१९.९ | ४.७६ | २४१६१.२९ | ११८८१७.३ | २०.३३ |
| १९९७-९८ | ८७८४.१९ | १५४१७६.३ | ५.७ | २४८३२.४५ | १३०१००.६ | १९.०९ |
| १९९८-९९ | १४५६६.४८ | १७८३३१.७ | ८.१७ | २५५१०.६४ | १३९७५१.८ | १८.२५ |
| १९९९-०० | १६०६६.७३ | २१५५२८.५ | ७.४५ | २५३१३.६६ | १५९०९५.२ | १५.९१ |
| २०००-०१ | १२०८६.२३ | २२८३०६.६ | ५.२९ | २८६५७.३७ | २०१३५६.५ | १४.२३ |
| २००१-०२ | १६२५६.६१ | २४५१९९.७ | ६.६३ | २९७२८.६१ | २०९०१८ | १४.२२ |
| २००२-०३ | १७६०८.८३ | २९७२०५.९ | ५.९२ | ३४६५३.९४ | २५५१३७.३ | १३.५८ |
| २००३-०४ | २१९७२.६८ | ३५९१०७.७ | ६.१२ | ३७२६६.५२ | २९३३६६.८ | १२.७ |
| २००४-०५ | २२८११.८४ | ५०१०६४.५ | ४.५५ | ४१६०२.६५ | ३७५३३९.५ | ११.०८ |
| २००५-०६ | २१४९९.२२ | ६६०४०८.९ | ३.२६ | ४९२१६.९६ | ४५६४१७.९ | १०.७८ |
| २००६-०७ | २९६३७.८६ | ८४०५०६.३ | ३.५३ | ६२४११.४२ | ५७१७७९.३ | १०.९२ |
| २००७-०८ | २९९०६.२४ | १०१२३१२ | २.९५ | ७९०३९.७२ | ६५५८६३.५ | १२.०५ |
| २००८-०९ | ३७१८३.०३ | १३७४४३६ | २.७१ | ८५९५१.६७ | ८४०७५५.१ | १०.२२ |
| २००९-१० | ५९५२८.३४ | १३६३७३६ | ४.३७ | ८९३४१.३३ | ८४५५३३.६ | १०.५७ |
| २०१०-११ | ५७३३४.३२ | १६८३४६६.९६ | ३.४१ | ११७४८३.६१ | ११४२९२१.९२ | १०.२८ |
| २०११-१२(झ) | ७७०७१.७३ | २३४५९७२.७० | ३.२८ | १८७४७५.८९ | १४३९२८०.५१ | १२.८५ |
| **संयुक्त वृद्धीदर(%)** | **१५.२३** | **२०.७६** | **-४.५७** | **१३.२२** | **१८.०३** | **-४.१०** |

Source:- Director General of Commercial Intelligence & Statistics, Ministry of Commerce, Kolkata.
P-Provisional

कोष्टक क्र. १ मध्ये सन १९९५-९६ पासून २०११-१२ पर्यंत भारताच्या आयात-निर्यातीमधील शेतमाल आयात-निर्यातीचा हिस्सा, शेतमाल आयात,शेतमाल निर्यात,एकूणआयात व एकूण निर्यात दर्शविली आहे. सन १९९५-९६ मध्ये शेतमाल आयातीचा हिस्सा ४.८०% होता. त्या घट होऊन २०११-१२ मध्ये ३.२८% झाला व शेतमाल निर्यातीचा हिस्सा १९.१८% होता त्यात घट होऊन १२.८५% झाला. तसेच एकूण निर्यातीच्या मूल्याचासंयुक्त वृद्धीदर**१८.०३**% तर एकूण आयातीच्या मूल्याचा संयुक्त वृद्धीदर**२०.७६**% आहे.परंतु शेतमाल निर्यातीच्या मूल्याचा संयुक्त वृद्धीदर**१३.२२**% तर शेतमाल आयातीच्या मूल्याचा संयुक्त वृद्धीदर**१५.२३**% आहे.

RESEARCH FRONT

**ISSN**
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## ७. भारतातील शेतमाल निर्यातीची प्रवृत्ती

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारतातील शेतमाल निर्यातीची प्रवृत्ती कोष्टक क्र. २ मध्ये दर्शविली आहे.

**कोष्टक क्र. २**

**भारतातील शेतमाल निर्यातीची प्रवृत्ती(रुपये कोटी)**

| वर्ष/वस्तू | कृषी आणि संबंधित उत्पादने | चहा | कॉफी | तांदूळ | गहू | कापूस | तंबाखू | काजूगर | मसाल्याचे पदाथ | ऑईल मिल्स् | फळे आणि वनस्पती | प्रक्रियायुक्त फळे व ज्यूस | समुद्री उत्पादन | साखर आणि मोलासिस | मासे आणि मत्स्य उत्पादन | इतर कृषी व संबंधित उत्पादने |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१९९५-९६** | २०३.४४ | ११.७१ | १५.०३ | ४५.६८ | ३.६७ | २.०४ | ४.४७ | १२.३७ | ७.९४ | २३.४९ | ५.२८ | ८.८८ | ३३.८१ | ५.०६ | ६.२७ | १७.७६ |
| **१९९६-९७** | २४३.६३ | १०.३७ | १४.२७ | ३१.७२ | ६.९९ | १५.७५ | ७.५७ | १२.८८ | १२.०२ | ३४.९५ | ५.७९ | १०.९० | ४०.०८ | १०.७८ | ७.०९ | २२.४८ |
| **१९९७-९८** | २४६.२६ | १८.७६ | १६.९६ | ३३.७१ | २.४७ | ८.२२ | १०.७० | १४.०७ | १४.१० | ३४.३५ | ५.९० | ६.४५ | ४४.८७ | २.५५ | ८.०८ | २७.५३ |
| **१९९८-९९** | २५३.८७ | २२.६५ | १७.२८ | ६२.८१ | ०.०१ | २.०७ | ७.६२ | १६.३२ | १६.३३ | १९.४२ | ५.४० | ७.१३ | ४३.६९ | ०.२४ | ७.८८ | २५.०३ |
| **१९९९-००** | २४३.०१ | १७.८५ | १४.३५ | ३१.२६ | २.४७ | ०.७७ | १०.०९ | २४.६१ | १७.६७ | १६.३८ | ६.४३ | ८.५३ | ५१.२५ | ०.४० | ८.१९ | ३५.२३ |
| **२०००-०१** | २७२.८८ | १७.८९ | ११.८५ | २९.३२ | ४.१५ | २.२१ | ८.६७ | २०.५४ | १६.१८ | २०.४५ | ८.४३ | १३.१८ | ६३.६७ | ५.०५ | १४.७० | ३६.६० |
| **२००१-०२** | २८१.४४ | १७.१९ | १०.९५ | ३१.७४ | १३.३० | ०.४३ | ८.०८ | १७.९४ | १४.९७ | २२.६३ | १०.५५ | १२.३७ | ५८.९८ | १७.८२ | ११.९३ | ३२.५७ |
| **२००२-०३** | ३२४.७३ | १६.५२ | ९.९४ | ५८.३१ | १७.६० | ०.५० | १०.२३ | २०.६२ | १६.५६ | १४.८७ | ११.८८ | १४.८४ | ६९.२८ | १८.१५ | १३.७७ | ३१.६७ |
| **२००३-०४** | ३४६.१६ | १६.३७ | १०.८६ | ४१.६८ | २३.९१ | ९.४२ | १०.९७ | १७.०५ | १५.४४ | ३३.४८ | १७.९२ | १४.०२ | ६१.०६ | १२.३६ | १७.१४ | ४४.४७ |
| **२००४-०५** | ३८०.७८ | १८.४० | १०.६९ | ६७.६९ | १४.६० | ४.२३ | १२.५५ | २४.८९ | १८.८३ | ३१.७८ | १७.९१ | १२.७७ | ६४.६९ | १.५५ | १९.०५ | ६१.१५ |
| **२००५-०६** | ४५२.२० | १७.३१ | १५.८९ | ६२.२१ | ५.५८ | २९.०४ | १३.३१ | २५.९३ | २१.१६ | ४८.७५ | २१.३४ | १५.८९ | ७०.३६ | ५.९८ | २७.५० | ७१.९६ |
| **२००६-०७** | ५७३.९२ | १९.७० | १९.६९ | ७०.३६ | ०.३५ | ६१.०८ | १६.८५ | २५.०७ | ३१.५८ | ५५.०४ | १.२२ | १८.३६ | ८०.०१ | ३२.६१ | ३३.१४ | १०८.८७ |
| **२००७-०८** | ७४२.०९ | २०.३४ | १८.७२ | ११७.५५ | ०.९९ | ८८.६५ | १९.३२ | २२.३५ | ४३.१५ | ८१.४० | ३०.६६ | २१.३६ | ६९.२७ | ५६.६३ | ३७.५० | ११५.१९ |
| **२००८-०९** | ८०६.४९ | २६.८९ | २२.५६ | १११.६४ | ०.०२ | २८.६६ | ३४.६१ | २९.३१ | ६३.३८ | १०२.६९ | ४५.१९ | ३१.७७ | ७०.६६ | ४५.३१ | ५३.७१ | १४०.०८ |
| **२००९-१०** | ८४१.३६ | २९.४४ | २०.३२ | ११२.५५ | ०.९९ | ९५.३७ | ४३.४४ | २८.२९ | ६१.५७ | ७८.३२ | ५३.५६ | ३२.५५ | ९९.०० | १.३० | ६२.८६ | १२२.७९ |
| **२०१०-११** | ११०२.९६ | ३३.५४ | ३०.१० | ११५.८६ | ०.०१ | १३१.६१ | ३९.८५ | २८.५३ | ८०.४४ | ११०.७० | ४९.०५ | ३६.६९ | ११९.१७ | ५६.३३ | ८९.६० | १८१.४८ |
| **२०११-१२** | १७९३.३१ | ४१.३९ | ४५.३३ | २४१.१९ | १०.२४ | २१६.२३ | ४०.०६ | ४४.५० | १३१.७६ | ११७.६२ | ५७.०६ | ५४.६४ | १६५.८८ | ८९.८४ | १४१.११ | ३९६.४७ |
| **संयुक्तनिर्यातवृद्धीदर (%)** | **१२.७४** | **५.७५** | **४.९९** | **१०.८२** | **-१३.३०** | **३४.०४** | **१३.३०** | **६.०८** | **१५.२२** | **११.९१** | **१५.८८** | **११.७२** | **७.५५** | **२०.८९** | **२०.२१** | **१७.९३** |

Source-RBI, Handbook of Statistics on the Indian Economy, Mumbai. 2011-12

कोष्टक क्र. २ मध्ये भारतातील प्रमुख शेतमालाच्या निर्यातीत सन १९९५-९६ ते २०११-१२ या वर्षापर्यंत झालेला बदल दर्शविला आहे. कृषी आणि संबंधित उत्पादनाचा संयुक्त वृद्धीदर १२.७४% एवढा आहे. याच काळात चहाचा संयुक्त निर्यात वृद्धीदर ५.७५%, कॉफीचा ४.९९%, तांदूळ १०.८२%, गहू -१३.३०%, कापूस ३४.०४%, तंबाखू १३.३०%, काजूगर ६.०८%, मसाल्याचे पदार्थ १५.२२%, ऑईल मिल्स् ११.९१%, फळे आणि वनस्पती १५.८८%, प्रक्रियायुक्त फळे व ज्यूस ११.७२%, समुद्री उत्पादन ७.५५%, साखर आणि मोलासिस २०.८९%, मासे आणि मत्स्य उत्पादन २०.२१% व इतर कृषी व संबंधित उत्पादनाचा वृद्धीदर १७.९३% एवढा होता.भारतातीलशेतमाल निर्यातीपैकी कापूस या शेतमालाचा संयुक्त निर्यात वृद्धीदर ३४.०४% एवढा आहे व सर्वात कमी गहू या शेतमालाचा संयुक्त निर्यात वृद्धीदर१३.३०% एवढा आहे.

## ८. भारतीय शेतमाल निर्यातीची दिशा

### १. चहा

भारत हा जगातील चहा निर्यात करणारा प्रमुख देश आहे. देशातून जर्मनी, इराण, इराक, जपान, कजाकिस्थान, पोलंड, रशिया, यु.ए.ई., यु. के., यु. एस. ए व इतर देशांना भारतातून चहाची निर्यात केली जाते. रशियाला सर्वाधिक चहाची निर्यात केली जाते. १९९५-९६ मध्ये एकूण निर्यातीत रशियाचा ४०.६९% हिस्सा होता तो घटून २०११-१२ मध्ये १३.८२% झाला आहे.

### २. कॉफी

भारत हा चहा बरोबर कॉफी निर्यात करणारा प्रमुख देश आहे. बेल्जियम, जर्मनी, इटली,लेटव्हिया, नेदरलॅड, रशिया, स्पेन, स्विझरलँड, यु.के, यु.एस.ए. व इतर देशांना भारतातूनकॉफीची निर्यात केली जाते. १९९५-९६ मध्ये रशिया २२.६९% इतका सर्वाधिक होता. आता २०११-१२ मध्ये इटलीचा २०.७०% हिस्सा सर्वाधिक होता.

### ३. तांदूळ

जगाच्या एकूण तांदूळ निर्यातीत भारताचा सन २०१० मध्ये ११.२% हिस्सा होता. भारतातून बांग्लादेश, फ्रान्स, कुवेत, सौदी अरेबिया, यु. ए. इ., यु.के, यु.एस.ए. येमन व इतर देशांना केला जातो. सन १९९५-९६ मध्ये बांग्लादेशाला सर्वाधिक २०.८३% एवढी निर्यात केली होती. तर सन २०११-१२ मध्ये यु.ए.ई. ला१६.३१% एवढी सर्वाधिक निर्यात केली.

### ४. तंबाखू

भारतातून कच्ची व प्रक्रियायुक्त तंबाखूची निर्यात केली जाते. भारतातून बेल्जियम, जर्मनी, नेदरलँड, रशिया, सौदी अरेबिया, सिंगापूर, यु.ए.इ., यु. के., यु.एस.ए. येमन व इतर देशांना केली जाते. सन १९९५-९६ मध्ये यु. के. या देशाला सर्वाधिक हिस्सा होता व सन२०११-१२ मध्ये बेल्जीयम या देशाचा सर्वाधिक हिस्सा १६.११% होता.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**५. मसाल्याचे पदार्थ**

भारताच्या निर्यातीत मसाल्याचे पदार्थ पारंपारिक घटक म्हणून ओळखला जातो. जगाच्या एकूण मसाल्याच्या पदार्थ निर्यातीत भारताचा हिस्सा १५.५%, सन २०१० मध्ये होता. भारतातून बांग्लादेश, जर्मनी, जपान, सौदी अरेबिया, सिंगापूर, स्पेन, श्रीलंका, यु.ए.ई., यु.के., यु. एस.ए. व इतर देशांना केला जातो. भारताच्या मसाल्याच्या पदार्थ निर्यातीत यु.एस. ए. चा सर्वाधिक हिस्सा आहे. तो १९९५-९६ मध्ये २१.३७% हिस्सा व २०११-१२ मध्ये १७.८% हिस्सा होता.

**६. काजूगर**

भारतातून काजूगरची निर्यात कॅनडा, फ्रान्स, इस्त्राईल, इटली, जपान, नेदरलँड, सौदी अरेबिया, यु.ए.ई., यु. के., यु.एस.ए. व इतर देशांना होते. भारताच्या काजूगर निर्यातीत यु.एस.ए. चा सर्वाधिक हिस्सा आहे. १९९५-९६ मध्ये २८.२३% होता तो वाढून २०११-१२ मध्ये ३३.७२% एवढा झाला.

**७. समुद्री उत्पादने**

भारतातून समुद्री उत्पादनाची निर्यात चीनी लोकसत्ताक,हाँगकाँग, इटली, जपान, स्पेन, थाईलंड, यु.एस.ई., यु.के., यु.एस.ए. व इतर देशांना होते. सन १९९५-९६ मध्ये समुद्री उत्पादनाची सर्वाधिक निर्यात जपानला झाली होती व तो ५३.८१% इतका हिस्सा होता. तर सन २०११-१२ मध्ये चीनी लोकसत्ताकला सर्वाधिक झाली व तो हिस्सा ९०.९६% होता.

**८. ज्यूटआणि ज्यूट उत्पादने**

भारतातून ऑस्ट्रेलिया, बेल्जीयम, जर्मनी, इटली, जपान, सौदी अरेबिया, तुर्की, यु. के., यु.एस.ए. व इतर देशांना निर्यात केली जाते. सन १९९५-९६ मध्ये सर्वाधिक निर्यात ऑस्ट्रेलियाला १.६९% केली व २०११-१२ मध्ये यू. एस. ए. ला सर्वाधिक १३.६९% एवढी केली.

## ९. निष्कर्ष

१. भारताच्या आयात-निर्यातीमधील शेतमाल निर्यातीच्या हिस्स्यापेक्षा शेतमाल आयातीच्या हिस्स्यांचा घटीचा दर जास्त आहे.
२. सन २०११-१२ मध्ये भारताच्या आयातीत शेतमाल आयातीचा हिस्सा ३.२८% होता तर भारताच्यानिर्यातीत शेतमाल निर्यातीचा हिस्सा १२.८५% होता.
३. भारतातील शेतमाल निर्यातीपैकी कापूस या शेतमालाचा संयुक्त निर्यात वृद्धीदर ३४.०४% एवढा आहे
४. भारतातील शेतमाल निर्यातीपैकी सर्वात कमी गहू या शेतमालाचा संयुक्त निर्यात वृद्धीदर १३.३०% एवढा आहे.
५. भारतातील शेतमालापैकी तांदूळ या पिकांचा संयुक्त निर्यात वृद्धीदर हा सर्वाधिक म्हणजे ४१९.६६ एवढा आहे.
६. भारताच्या शेतमाल निर्यातीत १९९५ व २०११ मध्ये तांदूळ या पिकांचा सर्वाधिक हिस्सा आहे.
७. सन १९९५-९६ ते २०११-१२ मध्ये भारताच्या शेतमाल संयुक्त निर्यातवृद्धीदर १२.७४%एवढा आहे.

८. भारताच्या एकूण आयातीपेक्षा निर्यात कमी असल्याने भारताचा व्यापारतोल प्रतिकूल आहे.

९. भारताच्या एकूण आंतरराष्ट्रीय व्यापार ओ.ई.सी.डी. पश्चिम युरोप बरोबर घटला आहे.ओ.पी.ई.सी., आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील देश याबरोबर वाढला आहे.

१०. सन २०११ मध्ये जगाच्या एकूण निर्यातीमध्ये भारताच्या निर्यातीचा हिस्सा १.७०% होता. तांदूळाच्या निर्यातीत ११.२%, मसाल्याच्या पदार्थाच्या निर्यातीत १५.५% होता.

११. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर भारताच्या निर्यातीत वाढ झाली परंतु ती नगण्य आहे.

## १०. समारोप

१ जानेवारी १९९५ ला आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करण्यासाठी व व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना केली व त्यामध्ये शेती क्षेत्राचा व्यापार वाढविण्यासाठी शेती व्यापाराचा त्यात समावेश केला. भारताला जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार देशांतर्गत अनुदान, निर्यात अनुदान, मुक्त बाजार प्रवेश, आयात करात घट व संख्यात्मक बंधने कमी करावी लागली. त्याचा भारताच्या व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला. जागतिक निर्यातीतील भारताचा हिस्सा वाढत असलातरी त्याचे प्रमाण १.५% एवढे नगण्य आहे. तसेच भारताच्या निर्यातीपेक्षा आयात जास्त असल्याने व्यापारतोल प्रतिकूल आहे. १९९५-९६ ते २०११-१२ या काळात शेतमाल निर्यातीच्या मूल्यात वाढ झाली परंतु भारताच्या एकूण निर्यातीतील हिस्स्यात घट झाली आहे. तसेच शेतमाल निर्यातीच्या दिशेत बदल झाला आहे. सन २०११ च्या जगाच्या एकूण निर्यातीत भारताच्या निर्यातीचा हिस्सा १.७०% आहे.

## ११. सदंर्भसूची

1. Agricultural Statistics at a Glance 2011, Directorate of Economics & Statistics, Directorate ofEconomics & Statistics, Ministry of Agriculture, GOI, New Delhi.
2. RBI, Handbook of Statistics on the Indian Economy, Mumbai.2011-12.
3. Economic Survey 2010-11, Gove. of India, Oxford Publication, Mumbai.
4. Gaurav Datta & Ashwini Mahajan, Datta & Sundharam Indian Economy, S.Chand & Company Ltd; New Delhi, 2010 (62nd R.E.)
5. Branda Rodrigues & Manoj S. Kamat, IndiaAgriculture and the wto: Developmental Agenda and Challenges, Shree Damodar College of Commerce & Economics G. R. Kare Road, Maegao- Goa. accessed on 13 June 2013
6. AGREEMENT ON AGRICULTURE,WTOwww.wto.org.
7. जाधव, जे. जी आणि गुरव, एन. एन. (२०१२), भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील प्रवृत्ती, Research Volume on Recent Trends in Indian's International Trade, Vol. - I - 2012] ISBN : 978-81-923914-0-3.Shri.Sadguru Gangageer Maharaj Science, Goutam Arts and Snajivani Commerce College, Kopargaon, Dist- Ahmednagar.

***